६९)

# दीपावली

विधात्याने निर्मिलेल्या अवकाशात
रोजच तारकांची दीपावली
ना त्यात खंड, ना त्यात दोष
रोजच सजते आकाशात रंगावली

निसर्गाच्या सानिध्यात वैविध्यता
फुला-फळांच्या रंगसंगतीने आणि
नदी-सागराच्या कल-रवाने
बहरते अवनी वरती नित्य दीपावली

मानवाची दीपावली ही मात्र
सजते ही पैसा अन् लखलखाटने
राग अन् लोभ, स्वार्थ, परमार्थाने
खोट्या, मोठ्या आविर्भावाने



आता मात्र वेळ आहे परिवर्तनाची
राव अन् रंक मिळूनी दिवाळी
एकत्र मनवण्याची
होतो आहे बदल कासवगतीने
करू नवी सुरुवात उत्स्फूर्तपणे

लावू सगळे मिळून पणतीला पणती
उजळून टाकू स्वदेशाला
करू प्रदूषण मुक्त दीपावलीला
भिडवू विकासाच्या कंदील गगनाला

या रे या सारे या
उडवुया चांगल्या विचारांच्या फुलबाज्या
सुंदर, सुरेख संस्कृतीचे विचार
दर पिढीमध्ये रुजुया